मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 2807
दिनांक - 27/8/11
जावक दिनांक - 27/8/11
विभाग - D/N.S.S.

**राष्ट्रीय सेवा योजना**
सन २०११-१२ या वर्षासाठी रासेयो विद्यापीठ-निहाय विद्यार्थी संख्या मंजुर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र.रासेयो २०११/प्रक्र-८०/साशि-७
मंत्रालय कक्ष,एलफिस्टन तंत्र विद्यालय परिसर,मंबई-४०० ००१.
दिनांक:- १२ ऑगस्ट, २०११

पहा :- १) भारत सरकार,युवा कार्य व क्रिडा विभाग मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय केंद्र पुणे यांचे एफ.क्र.१४/५/एन.एस.एस./आर.सी./२०११/१४-१५ चे दि. दिनांक ५/४/११ चे पत्र
२) भारत सरकार युवा कार्य व क्रिडा विभाग शास्त्री भवन दिल्ली यांचे क्र.जे.१२०११/२/२०११-एन.एस.एस.(सी)दि.२१/४/११.

**प्रस्ताविक :-** राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून या याजने अंतर्गत नियमित कार्यक्रम आणि विशेष शिबीर या दोन उपक्रमासाठी विद्यापिठ /संस्थांना दरवर्षी केंद्र शासनातर्फे विद्यार्थी संख्या मंजुर करण्यात येते. सन २०११-१२ या वर्षासाकरीता संदर्भाधीन पत्रान्वये केंद्र शासनाने रा.से.यो. विद्यापिठनिहाय प्रवर्गनिहाय म्हणजेच आहे.अनुसूचित जातीसाठी १७%/- अनुसुचित जमाती ७% इतरांसाठी ७६% अशाप्रमाणे विभागणी करून अनुसूचित जातीसाठी ५२७२० अनुसूचित जमातीसाठी २१७०० व इतरासाठी २३५७०४ प्रमाणे प्रवर्ग विभागणी करून एकुण नियमित कार्यक्रमांसाठी ३,१०,१२४ आणि विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी १,५५,०६२ इतकी विद्यार्थी संख्या महाराष्ट्र राज्याकरिता मंजूर केली असून त्याचे विद्यापीठ / संस्थानिहाय वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेसाठी सन २०११-१२ च्या मंजूर तरतूदीनुसार योजनांतर्गत नियमित कार्यक्रमासाठी ७८,१२४ व विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी ३९,०६२ तसेच योजनेतर नियमित कार्यक्रमासाठी २,३२,००० व विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी १,१६,००० विद्यार्थी संख्या असे दोन्ही मिळून राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम राबविण्यासाठी नियमित कार्यक्रमांसाठी ३,१०,१२४ आणि विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी १,५५,०६२ अशी विद्यार्थी संख्या मान्य करण्यात आली असून ती विद्यापीठ / संस्थानिहाय खालील अ आणि ब प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

**अ-विभाग (योजनेतर)**

सन २०११-१२ करिता योजनेत्तर साठी (Non-Plan) नियमित कार्यक्रमासाठी प्रवर्गनिहाय २,३२,००० व विशेष शिबीर कार्यक्रमांसाठी १,१६,००० विद्यार्थी संख्येचे वाटप विद्यापिठनिहाय विद्यार्थीसंख्या वाटप खालीलप्रमाणे-

SLO
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
2718
27/8/2011

## अ-विभाग (योजनेतर)

| अक्र | विद्यपिठाचे नांव | नियमित कार्यक्रम (स्वयंसेवक संख्या) प्रवर्गनिहाय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | अनु. जाती SC | अनु. जमाती ST. | इतर Other | विशेष शिबिर स्वयंसेवकसंख्या |
| १) | पूर्ण विद्यापिठ पूर्ण | ४५,००० | ७६०० | ३१५० | ३४२५० | २२,५०० |
| २) | मुंबई विद्यापिठ मुंबई | ४०,००० | ६७०० | २८०० | ३०५०० | २०,००० |
| ३) | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्या. | ३३,००० | ५५०० | २३०० | २५२०० | १६,५०० |
| ४) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा औरंगाबाद | ३१,५०० | ५३०० | २२८० | २३९२० | १५,७५० |
| ५) | शिवाजी विद्या.कोल्हापूर | २३,००० | ३९०० | १६०० | १७५०० | ११,५०० |
| ६) | स्वामि रामानंद तीर्थ मराठवाडा विद्या नांदेड | १४,००० | २३५० | ९८० | १०६७० | ७,००० |
| ७) | उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्या. | १३,५०० | २२५० | ९४० | १०३१० | ६,७५० |
| ८) | संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मुंबई | १०,००० | १६४० | ७०० | ७६६० | ५,००० |
| ९) | सोलापूर वि.सोलापूर | ९,१५० | १५०० | ६४० | ७०१० | ४,५७५ |
| १०) | महात्मा फुले वि.राहुरी | ३,००० | ५०० | २०० | २३०० | १,५०० |
| ११) | मराठवाडा कृषी वि.परभणी | २,८०० | ४०० | १९० | २२१० | १,४०० |
| १२) | डॉ.पंजाबराव देशमुख कृषी वि.अकोला | २,००० | ३०० | १४० | १५६० | १,००० |
| १३) | यशवंतराव चव्हाण मुक्त वि.नाशिक | १,५०० | २०० | १०० | १२०० | ७५० |
| १४) | भारती विद्या.पुणे | १,४५० | २०० | १०० | ११५० | ७२५ |
| १५) | डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी वि.दापोली | १,२०० | २०० | ८० | ९२० | ६०० |
| १६) | संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई | ४०० | ६० | २० | ३२० | २०० |
| १७) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र वि.लोणेरे | ३०० | ५० | २० | २३० | १५० |
| १८) | कविकुलगुरू कालिदास संस्कृत वि.रामटेक | २०० | ३० | १० | १६० | १०० |
| | एकूण/- | २,३२,००० | ३८,६८० | १६,२५० | १,७७,०७० | १,१६,००० |

विद्यापीठ /संस्थानी शासनाने त्यांना वरील प्रमाणे रा.से.यो.विद्यापिठनिहाय प्रवर्गनिहाय मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी संख्या या योजनेखाली नोंदवून घेउ नये. तसेच सन २०११-१२ या वर्षासाठी प्रवर्गनिहाय विद्यार्थी संख्येनुसार विद्यापीठे /संस्थानी संबधितांना वाटप करण्यात यावेत.

प्रत्येक विद्यापिठ/संस्थेने संलग्न महाविद्यालयांना विद्यार्थी संख्याचे वाटप करताना ५०पेक्षा कमी व २०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्याचे वाटप होणार नाही असे पहावे.

वरील विद्यापिठ/संस्थानी त्यांना वाटप केलेल्या विद्यार्थी संख्येचे त्यांना संलग्न असलेल्या सर्व महाविद्यलयांन प्रवर्गनिहाय वाटप करावे व त्याची प्रत शासनास पाठवावी. विद्यापीठाने प्रत्यक्षात नोंदविलेल्या विद्यार्थीची संख्या शासनाला दि. ३०/९/२०११ पर्यंत कळवावी.

या आदेशानुसार मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येकरिता सन २०११-१२ अनुदानाचा प्रथम हप्ता अग्रिम लवकरच मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

योजनांतर्गत मधील एकुण विद्यार्थीसंख्येस नियोजन विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. १९६७, दि. २५.०७.२०११ अन्वये आणि योजनेतर मधील एकुण विद्यार्थीसंख्येस वित्त विभागाच्या अनौ.सं. क्र.४४९/व्यय-५ दिनांक ८.८.२०११ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून संगणक संकेतांक क्रमांक **२०११०८२०१५४४०१००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.प्रमोदन,पाब्रेकर )
राज्य संपर्क अधिकारी / विशष कार्य अधिकारी

प्रत,

उप सचिव,भारत सरकार,युवा कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय,शास्त्री भवन,नवी दिल्ली.
सहाय्यक कार्यक्रम सल्लागार ,राष्ट्रीय सेवा योजना विभागीय केंद्र पुणे,
कुलसचिव,सर्व विद्यापिठे
संचालक,उच्च शिक्षण पुणे.
संचालक,शालेय शिक्षण (+२ स्तर)पुणे.
संचालक तंत्र शिक्षण ,मुंबई.
संचालक,(प्रशिक्षण)व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई
कार्यक्रम समन्वयक,राष्ट्रीय सेवा योजना, सर्व विद्यापीठे
नियोजन विभाग (कार्यासन १४७१)
वित्त विभाग (व्यय-५)
वित्त विभाग (अर्थसंकल्प-८)
उ.व तं.शि.वि.क.अ. (अर्थसंकल्प)
निवड नस्ती, साशि-७

# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पी.एच्.डी
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र.: ०२०-२५६९०३४१
२५६०११५३, २५६०११६०
फॅक्स क्र.: ०२०-२५६९०३४१
मोबाईल : ९८२२७०७०६१


संदर्भ : रासेयो/१०५०/२०११ दि. १३ ऑक्टों. २०११

प्रति
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत असलेली सर्व संलग्न महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय : सन २०११—२०१२ वर्षाची प्रवर्गानुसार संख्या पाठविणेबाबत..
संदर्भ : शासन निर्णय क्र.रासेयो २०११/पक्र—०८/साशि—७

महोदय,

. शासनाच्या वरील संदर्भीय परिपत्रकाद्वारे दि. १३ ऑक्टोंबर २०११ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार रासेयो अंतर्गत पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांमधील प्रवर्गानुसार माहिती शासनास त्वरीत दयावयाची असल्याकारणाने सर्व महाविद्यालयांकडून प्रवर्गानुसार माहिती मागविण्यात येत आहे.

| अनुसूचित जाती (SC) | अनुसूचित जमाती (ST) | इतर सर्व (Other) |
|---|---|---|
| | | |

तरी आपण आपल्या महाविद्यालयातील प्रवर्गानुसार अद्ययावत माहिती वरीलप्रमाणे टेवल नमुन्यामध्ये त्वरीत रासेयो कार्यालयास फॅक्स अथवा मेलद्वारे कळविण्यात यावी ही विनंती. तसेच अनुसूचित जाती (SC) व अनुसुचित जमातींचे (ST) जातीच्या सहभागी रासेयो स्वयंसेवकांच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत आपल्या ऑफीसमध्ये जमा करून घेणे अत्यावश्यक आहे. यासंदर्भात सविस्तर माहितीकरीता सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in या संकेतस्थळ उपलब्ध असून संगणक संकेतांक क्रमांक२०११०८२०१५४४०१००१ असा आहे.

आपली विश्वासू,

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : महाराष्ट्र शासन निर्णय प्रत.